# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर

### अपिल क्रमांक ५/२०११

### सुनावणी दिनांक ०६/०४/२०११

श्री किशोर बापूराव टाकणे
सह्याद्री को.ऑप.हौ.सोसायटी,
बी.नं.सी-२, रुम नं.२/३, ८ बी,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४

अपिल करणार

विरुध्द

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
मुंबई

प्रतिवादी

## आदेश

श्री. किशोर बापुराव टाकणे यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १०/२/२०११ रोजी अर्ज करुन, त्यामध्ये म.प्र. नि. मंडळाचे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांची तक्रार त्यांनी महाराष्ट्र राज्याचे मा. गृहमंत्री यांच्यामार्फत, बेलापूर पोलीस ठाणे येथे केली होती, त्यामध्ये त्यांच्यावरील आरोपात प्राथमिक सत्यता आढळल्यामुळे, ते शासकीय सेवेत असल्याकारणाने खातेनिहाय चौकशीसाठी मा.अध्यक्षा, म. प्र. नि. मंडळाकडे पाठविलेल्या अहवालाची छायाप्रत, पोलीस खात्याच्या इतर सर्व अहवालासोबत साक्षांकित करुन देण्याबाबत विनंती करण्यात आली होती. तसेच मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचा खातेनिहाय चौकशीबाबतचा अहवाल मा. अध्यक्ष महोदया, म. प्र. नि. मंडळ यांच्याकडे कधी प्राप्त झाला,याची तारीख लिखित स्वरुपात दयावी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्या खातेनिहाय चौकशीसाठी नेमलेले अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांच्या नेमणूकीच्या आदेशांची छायाप्रत उपलब्ध करुन देण्याबाबत अर्ज केला होता. तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली आणि खातेनिहाय चौकशी किती कालावधीत पूर्ण होईल, साक्षीदारांची नावे वगैरे माहिती मागविण्यात आलेली होती.

सदरहू अर्ज प्राप्त झाल्यानंतर सहायक माहिती अधिकारी यांनी वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्याकडून दिनांक ११/०२/२०११ च्या पत्राद्वारे सदरहू १६ मुददयांवर माहिती मागितली होती. मात्र सदरहू माहिती प्राप्त झालेली नसल्यामुळे, अपिल करणार यांनी हे अपिल केलेले आहे. त्यापूर्वी वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक १०/०३/२०११ च्या पत्राद्वारे अपिल करणार यांच्यासंबंधीची पूर्ण नस्ती, सी.बी.डी. पोलीस स्टेशनच्या संपूर्ण अहवालासहीत मा. सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेली असल्याचे आणि म. प्र. नि. मंडळातील आस्थापना विभागाचे प्रथम लिपिक श्री. उमाकांत नाईक यांना सदरहू नस्ती घेण्यासाठी पाठविले असता, पर्यावरण विभागामार्फत आणखी काही कालावधी सदरहू नस्ती परत करण्यास लागणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्याप्रमाणे अपिल करणार यांनादेखील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी एक प्रत देऊन, लेखी कळविलेले आढळते. माहिती अधिकारी, म. प्र. नि. मंडळ यांनी दिनांक ११/०३/२०११ च्या पत्राद्वारे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्या पत्राची प्रत अपिल करणार यांना पाठवून, सदरहू नस्ती मिळेपर्यंत आणखी काही कालावधी लागणार असल्याचे कळविले.

सी.बी.डी. बेलापूर, पोलीस स्टेशनसंदर्भातील नस्ती पर्यावरण विभागाकडे आस्थापनाशाखेच्या दिनांक १५/०१/२०११ च्या अर्धशासकीय पत्राद्वारे सचिव, पर्यावरण, मंत्रालय यांच्याकडे पाठविण्यात आली. त्याबाबतची जावक नोंद देखील अपिल करणार यांना दाखविण्यात आली.

सहायक माहिती अधिकारी यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, अपिल करणार यांनी माहिती अधिकारी, पर्यावरण विभाग यांच्याकडे देखील सदरहू माहिती मागविण्याकरिता अर्ज केलेला असून, त्याबाबत पर्यावरण विभागाचे माहिती अधिकारी यांनी पर्यावरण विभागाकडे उपलब्ध असलेली माहिती दिनांक १४/०३/२०११ च्या पत्राद्वारे अपिल करणार यांना दिलेली असून, माहिती अधिकारी यांना सदरहू माहिती दिल्याबाबतच्या पत्राची प्रत दिनांक २१/०३/२०११ रोजी मिळालेली आहे. या पत्राद्वारे माहिती अधिकारी, पर्यावरण विभाग यांनी म. प्र. नि. मंडळाचे माहिती अधिकारी यांना श्री. किशोर टाकणे यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १२ ते १५ बाबतची माहिती देण्याकरिता कळविले आहे. त्यानंतर माहिती अधिकारी यांनी दिनांक २८/०३/२०११ च्या पत्राद्वारे पर्यावरण विभागाचे माहिती अधिकारी यांना श्री. किशोर टाकणे यांचा दिनांक १०/०२/२०११ चा अर्ज दिनांक १४/०३/२०११ पत्रासोबत जोडला नसल्याचे निदर्शनास आणून दिले व त्यांची एक प्रत देण्याबाबत कळविले. सदरहू प्रत माहिती अधिकारी यांना दिनांक २९/०३/२०११ रोजी उपलब्ध करुन देण्यात आली.

वरील बाबतीत असे आढळून येते की, सी.बी.डी. बेलापूर पोलीस स्टेशनकडून प्राप्त झालेला अहवाल अध्यक्ष महोदया यांच्यानावे असून, तो त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असू शकेल. त्यामुळे श्री. उमाकांत नाईक यांना सदरहू नस्ती आणि कागदपत्रे पर्यावरण

विभागाकडून प्राप्त करुन घेण्याकरिता पाठविण्यात आले होते. अशा परिस्थितीमध्ये सदरहू नस्ती आणि कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे, माहिती अधिकारी, म. प्र. नि. मंडळ हे माहिती देऊ शकलेले नाहीत. तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी हे लातूर कार्यालयामध्ये प्रशासकीय लेखा परीक्षणाकरिता गेलेले असल्यामुळे, अपिल करणार यांच्या अपिलातील मुददयांबाबत आस्थापनाशाखेतील कर्मचा-यांकडून माहिती घेणे क्रमप्राप्त होत आहे. इतर माहिती पर्यावरण विभागाकडून नस्ती प्राप्त झाल्यानंतर आस्थापना शाखेने उर्वरित माहिती अपिल करणार यांना माहिती अधिकारी यांच्यामार्फत उपलब्ध करुन दयावी.

**मुद्दा क्रमांक १ :-** बेलापूर पोलीस ठाणे व मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी हे शासकीय सेवेत असल्यामुळे खातेनिहाय चौकशीसाठी अध्यक्ष महोदया, म. प्र. नि. मंडळ यांच्याकडे अहवाल पाठविला असल्याचे आढळते. मात्र, सदरहू अहवाल आस्थापनाशाखेकडे उपलब्ध नसल्यामुळे, श्री. उमाकांत नाईक यांना सदरहू नस्ती आणि इतर कागदपत्रे पर्यावरण विभागाकडून उपलब्ध करुन घेण्याकरिता पाठविले असता, सदरहू नस्ती उपलब्ध करुन देण्यास कालावधी लागणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

मात्र, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मप्रनि मंडळ यांच्या दिनांक १०/३/२०११ च्या पत्रावरुन असे आढळून येते की, सी.बी.डी.पोलीस स्टेशनचा संपूर्ण अहवाल, माननीय सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी यापूर्वीच पाठविण्यात आलेला आहे. प्रत्यक्षात असे आढळून येते की, सदरहू अहवाल माननीय अध्यक्ष महोदया, मप्रनि मंडळ यांच्या नावे असल्यामुळे, तो त्यांच्याकडे गेला असल्याचे आढळते. अपिल करणार यांच्या म्हणण्याप्रमाणे आणि त्यांच्याकडे उपलब्ध असणा-या दस्तऐवजाप्रमाणे सदरहू पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचा अहवाल आस्थापना शाखेकडे न जाता, थेट अध्यक्ष महोदया, मप्रनि मंडळ यांच्याकडे गेलेला आहे. त्यामुळे तो आस्थापना शाखेकडे प्राप्त होण्याचा प्रश्न उदभवत नाही. अपिल करणार यांचे असे म्हणणे आहे की, जर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी अध्यक्ष महोदया यांच्याकडे माहिती घेण्यासाठी माणूस पाठविला असता, तर त्यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये निश्चितच संबंधीत माहिती दिली असती.

**मुद्दा क्रमांक २:-** मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचा खातेनिहाय चौकशीबाबतचा अहवाल अध्यक्ष महोदया यांच्यानावे मप्रनि मंडळ, सायन, मुंबई येथे आवक झाल्यामुळे, त्याची मप्रनि मंडळाच्या संगणकावर आवक नोंद घेऊन, सदरचा अहवाल मंप्रनि मंडळाच्या अध्यक्षांकडे पाठविण्यात आला होता, असे अपिल करणार यांनी पर्यावरण विभागाकडून घेतलेल्या माहितीनुसार आढळून येते.

तरी मप्रनि मंडळामध्ये संगणकावर सदरहू नोंद प्राप्त असल्यामुळे, आस्थापना शाखेने सदरहू माहिती त्यांना उपलब्ध करुन दयावी, कारण अपिल करणार यांनी पर्यावरण

विभागाकडून घेतलेल्या माहितीनुसार सदरहू अहवाल मप्रनि मंडळामार्फत अध्यक्ष महोदया, मप्रनि मंडळ यांच्याकडे पाठविल्याचे आढळते.

**मुद्दा क्रमांक ३ ते १० :-** कार्यालय अधीक्षक, आस्थापनाशाखा यांनी दिलेल्या माहितीनुसार वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्या खातेनिहाय चौकशीसाठी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी नेमण्यात आले नसल्याचे स्पष्ट करण्यात आलेले आहे, त्यामुळे साक्षांकित प्रती उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे मुददा क्रमांक ३ ते १० या मुद्दयांबाबत आता माहिती देता येत नाही.

**मुद्दा क्रमांक ११ :-** कार्यालय अधीक्षक यांनी असे स्पष्ट केले की, सदरहू मुद्दयाबाबतची माहिती पर्यावरण विभागाकडे नस्ती असल्यामुळे म. प्र. नि. मंडळाकडे उपलब्ध नाही.

**मुद्दा क्रमांक १२ ते १७ :-** आस्थापना विभागामार्फत सदरहू माहिती १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन देत असल्याचे आश्वासन देण्यात आलेले आहे, त्याप्रमाणे आस्थापना विभागाने सदरहू माहिती सदरहू आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन दयावी.

अपिल करणार यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी सदरहू माहिती अपिल करण्यापूर्वी ३० दिवसांच्या आत उपलब्ध करुन देणे गरजेचे होते, मात्र, अशी माहिती उपलब्ध करुन न देता सर्व नस्ती अध्यक्ष महोदया, म. प्र. नि. मंडळ यांच्याकडे पाठविली असल्याचे मोघम उत्तर दिले. कारण मुद्दा क्रमांक १२ ते १७ बाबत आस्थापनाशाखा योग्य ती माहिती त्यांच्या स्तरावर देऊ शकत होते. आस्थापनाशाखेने सदरहू माहिती १५ दिवसात देतो, असे स्पष्ट केल्यामुळे अपिल निकाली काढण्यात येत आहे. तसेच पर्यावरण विभागाकडे असणारी नस्ती, सदरहू माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता आस्थापनाशाखेने योग्य ते प्रयत्न करावेत आणि सदरहू माहिती देखील सदरचे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन दयावी. अशी माहिती देताना आस्थापनाशाखेने १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधी घेऊ नये.

वरील माहिती जर आस्थापना शाखेने विहित वेळेमध्ये दिली असती तर, हे अपिल करण्याची पाळी अपिल करणार यांच्यावर आली नसती. तरी यापुढे विहित वेळेमध्ये माहिती देऊन, आस्थापना शाखेने पुढील अपिल करण्यास वाव देऊ नये. आस्थापना शाखेने वेळोवेळी माहिती न दिल्यामुळे, या कार्यालयाकडे अनेक अपिल येत आहेत. तरी वेळेत उपलब्ध असलेली माहिती देणेबाबत आस्थापना शाखेने योग्य ती काळजी घ्यावी.

दिनांक २०/४/२०११ रोजी मुंबई येथून,

( द. त्रि. देवळे )
अपिलीय अधिकारी